७१

रिट पिटीशन क्रमांक ५५६४-६७/१९८२,
१५२०६-२०८/१९८४, ४६४७/१९८२, ७३३९-४३/१९८२
१३६९६-७००/१९८३
श्री. प्रदीप डी. प्रभू आणि इतर
विरुध्द
महाराष्ट्र शासन व इतर

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वन जमिनीवरील अतिक्रमण करणाऱ्या अतिक्रमकांची पात्रता तपासण्यासाठी निरनिराळ्या जिल्ह्यासाठी महसूल अधिकारी व वन अधिकारी यांची समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १०९५/२३२५/प्र.क्र.९६/ज-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, १९९५.

वाचा :- १] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलइएन १०७८/३४८३/ग-१, दिनांक २७-१२-१९७८

२] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएलडी १०७९/१३६६/फ-३, दिनांक १२-९-१९७९

प्रस्तावना :

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलइएन-१०७८/३४८३/ग-१, दिनांक २७-१२-१९७८ अन्वये दिनांक १-४-१९७२ ते दिनांक ३१-३-७८ या कालावधीतील पड जमिनीवरील/गायरान जमिनीवरील व वन जमिनीवरील शेती प्रयोजनासाठीची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे आदेश दिले होते व शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एफएलडी १०७९/१३६६/फ-३, दिनांक १२-९-१९७९ अन्वये शासनाने असे आदेश दिले होते की, ज्या बहुसंख्य आदिवासी व भूमिहीनांची दिनांक १-४-१९७२ ते ३१-३-१९७८ या कालावधीतील अतिक्रमणे अपात्र समजून हटविण्यात आली आहेत त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावीत जेणेकरुन बहुसंख्य अतिक्रमणदारांना फायदा मिळू शकेल. ह्या शासन निर्णयानुसार असे ठरविण्यात आले होते की, उक्त कालावधीत अतिक्रमण करण्यात आलेली सर्व वन जमीन वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. या प्रमाणे शासनाचे आदेश झाल्यानंतर ज्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावयाची होती त्या सर्व अतिक्रमणदारांची पात्रता यादी तयार करण्यात आली होती. तेव्हा, सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्रमांक ५५६४-६७/१९८२, १५२०६-२०८/१९८४, १७७८/१९८६, ७३३९-४३/१९८२, १३६९६-७००/१९८३, ४६४७/१९८२ इतके दावे दाखल करण्यात आले होते. या सर्व पिटीशनमध्ये असा दावा करण्यात आला होता की, शासनाच्या निर्णयानुसार हे अतिक्रमणदार यांनी केलेले अतिक्रमणे नियमानुकूल

९८

जिल्हाधिकारी कार्यालय

कृ.मा.प.

करण्यास पात्र असताना देखील शासनातर्फे [ वन विभागातर्फे] तयार करण्यात आलेल्या पात्रता यादीमध्ये या आदिवासींची नावे अंतर्भूत करण्यात आलेली नाहीत. सबब, या अतिक्रमणांना पात्र ठरवून त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात यावीत. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दि. ७-३-१९९५ रोजी असा निर्णय दिला आहे की, शासनाने प्रत्येक जिल्ह्यासाठी सक्षम अधिकारी यांची नेमणूक करावी व त्याचे मार्फत अतिक्रमण केलेल्या आदिवासींची चौकशी करावी तसेच, प्रत्येक अतिक्रमणदार आदिवासीला नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांपुढे आपले म्हणणे मांडण्याची संधी द्यावी. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणी संदर्भात चर्चा करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली दि. ४-११-१९९५ रोजी बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ७-३-१९९५ च्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांसाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक करावी व सदर अधिकाऱ्यांनी आदिवासींच्या ताब्यातील अतिक्रमणाबाबतचे सर्व दावे तपासून घ्यावेत व संबंधित अतिक्रमण दावेदारांना त्यांचे हक्क शाबीत करण्यासाठी त्यांनी पुरावे दाखल करण्यासाठी संधी देऊन शासनाच्या वेळोवेळी अतिक्रमण नियमित करण्याबाबत निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे व केंद्र शासनाच्या दिनांक १८ सप्टेंबर, १९९० ला या बाबत निर्गमित मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अतिक्रमण नियमित करण्यास पात्र ठरत असल्यास, त्याप्रमाणे कार्यवाही करावी व अतिक्रमण नियमित करण्यास पात्र नसल्यास सर्वोच्च ~~[illegible]~~ न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ते काढून टाकण्यात यावे. याकरिता निरनिराळ्या जिल्ह्यातील जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती महसूल विभागाने त्वरीत करावी व प्रश्नांकित जमिनीवरील अतिक्रमणांची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढावीत.

<u>शासन निर्णय :</u>

या प्रकरणातील एकंदरीत वस्तुस्थिती व सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ७-३-९५ चा निर्णय व मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षेखाली दिनांक ४-११-१९९५ च्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन आता असे आदेश देत आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ७-३-१९९५ च्या निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ उप जिल्हाधिकारी, १ सहाय्यक वन संरक्षक व आदिवासी आयुक्त यांनी पद निर्देशित केलेल्या १ सहाय्यक प्रकल्प अधिकारी वर्ग-२, आदिवासी विभाग यांचा समावेश असलेली एक समिती संबंधित जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यात यावी. या समितीने आदिवासींच्या

..३..

राज्यातील तत्कालीन वन जमिनीवरील अतिक्रमणाबाबतचे दावे तपासून घ्यावेत व संबंधित अतिक्रमणधारांना त्यांचे हक्क शाबीत करण्यासाठी आणि पुरावे दाखल करण्यासाठी संधी देऊन राज्य शासनाच्या वेळोवेळी अतिक्रमण नियमित करण्या-बाबत निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे व केंद्र शासनाच्या दि. १८ सप्टेंबर, १९९० ला या बाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अतिक्रमण नियमित करण्यास पात्र ठरत असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करावी व अतिक्रमण नियमित करण्यास पात्र नसल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ते अतिक्रमण काढून टाकण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ क. को. त्रिरशीद ]
उप सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व